
03-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/2/2025 10:51 PM Page 1



## निवडक

### पर्ये म्हाळशेकरवाडा येथील म्हाळसा देवीचा आजपासून वर्धापनदिन सोहळा

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**साखळी, दि. २ :** म्हाळशेकरवाडा पर्ये–सत्तरी येथील म्हाळसा देवीचा ३६ वा. पुनः प्रतिष्ठापना वर्धापनदिन सोहळा शनिवार दि. ३ व रविवार दि. ४ मे रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त दि. ३ रोजी सकाळी देवीची नित्य पूजा, पुण्याहवाचन, प्राकारशुद्धी, देवता स्थापना, नवचंडी अनुष्ठान, त्यानंतर पूर्णाहुती, सांगणे, आरती, सार्वजनिक गाऱ्हाणे, पावणी व त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. संध्याकाळी ५ वाजता दिंडी व म्हाळसा महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम, रात्री ८ वाजता 'स्वर मैत्रीचा' हा सुगम संगीताचा बहारदार कार्यक्रम,रात्री १० वाजता गोरखनाथ राणे पुरस्कृत मंगलमूर्ती कलाकार भिरोंडा यांचे धमाल विनोदी कोंकणी नाटक 'हाय फाय लायफ' हे नाटक सादर होणार आहे.

रविवार दि. ४ रोजी देवीची नित्य पूजा, देवकार्य, सार्वजनिक अभिषेक, आरती, महाप्रसाद, संध्याकाळी ६ वाजता स्थानिक कलाकारांचे भजन, रात्री ८ वाजता बालकलाकारांचे कार्यक्रम, रात्री १० वाजता म्हाळशेकरवाडा महिला कलाकारांतर्फे 'हरी आमचो टेम्परी' हे नाटक सादर करण्यात येणार आहे. भाविकांनी दोन्ही दिवशीच्या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन म्हाळशेकरवाडा ग्रामस्थांतर्फे करण्यात आले आहे.

### गजांतलक्ष्मी संस्थानचा पालखी उत्सव, वर्धापनदिनानिमित्त ५ पासून विविध कार्यक्रम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. २ :** वळवई येथील श्री गजांतलक्ष्मी संस्थानचा पालखी उत्सव व श्रींचा स्थापना वर्धापनदिन सोहळा सोमवार दि. ५ ते शुक्रवार दि. ९ रोजीपर्यंत विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्त प्रत्येक दिवशी पालखी बँड वाद्यासह सकाळी ८ वाजता निघेल. श्रींचा वर्धापनदिन सोहळा शुक्रवार दि. ९ मे रोजी होणार आहे. शुक्रवारी नवचंडी कार्यक्रम होणार असून यादिवशी सकाळी ६ वाजता महासंकल्प, श्रीस पंचामृत महामस्तकाभिषेक, पूजा, ९ वाजल्यापासून विविध धार्मिक विधी, सुवासिनीकडून कुंकुमार्चन सकाळी १० ते दुपारी १२ पर्यंत राहील. दुपारी आरती व १.३० वाजता उल्हास तारी पुरस्कृत महाप्रसाद होईल. संध्याकाळी ७ वाजता पुराण, ७.३० वा. ह.भ.प.चिन्मई कामत हिचे कीर्तन होणार असून त्यांना दीपक वळवईकर व बाळकृष्ण खांडेपारकर साथ संगत करतील. त्यानंतर आरती व तीर्थप्रसाद होईल. तरी सर्व भाविकांनी व महाजनांनी उपस्थित रहावे असे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

### बोरी तामशिरे गड्डेर येथे स्मशान भूमीची पायाभरणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**बोरी, दि. २ :** बोरी ग्रामपंचायतीच्यातर्फे तामशिरे, अडूळशे, मटये व खारवडे, वाड्यावरील स्थानिक लोकांसाठी स्मशानभूमीची पायाभरणी करण्यात आली. याकामी बोरी कोमुनिदादने एक हजार मीटर जमीन देण्यात आलीअसुन, बोरी गावचे सरपंच जयेश नाईक , उपसरपंच्या भावना नाईक व स्थानिक पंच विनय बोरकर उपस्थित होते. बोरी कोमुनिदादचे अध्यक्ष हरेन बोरकर व ऍटॉर्नी मनोज बोरकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून कामाचा शुभारंभ करण्यात आला, या प्रसंगी सरपंच जयेश नाईक यांनी बोरी कोमुनिदादकडून बोरी गावातील विकासकामांसाठी व सामाजिक गोष्टी साठी बोरी कोमुनिदादनी दिलेल्या सहकार्याची दखल घेऊन या पुढे पण सहकार्याची अपेक्षा बोलून दाखवली.

यावेळी बोरी कोमुनिदादचे ऍटॉर्नी (कमाविसदार) मनोज बोरकर यांनी ग्रामस्थांकडून अश्या गोष्टीसाठी केवळ विरोध न करता सहकार्य करावे अशी विनंती केली. उपसरपंच भावना नाईक यांनी स्वागत केले व पंच विनय बोरकर यांनी आभार मानले, यावेळी माजी सरपंच मनुराय नाईक, माजी कोमुनिदाद अध्यक्ष नमेश वर्दे व स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरसीबी प्ले ऑफचे स्थान निश्चित करणार?

## चेन्नई सुपरकिंग्जशी आज भिडणार | कोहलीच्या खेळीकडे सर्वांच्या नजरा

**चेन्नई, दि. २ :**




इंडियन प्रिमिअर लीगचा ५२ वा सामना उद्या शनिवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात चेपॉक मैदानावर खेळविला जाणार आहे. सात विजयांसह, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू प्लेऑफसाठी पात्रतेच्या जवळ आहे. महेंद्रसिंग धोनी आणि विराट कोहली यांच्या उपस्थितीमुळे हा सामना खास बनला आहे कारण क्रिकेटप्रेमींना भारतीय क्रिकेटमधील या दोन दिग्गजांना कदाचित शेवटच्या वेळी एकमेकांविरुद्ध खेळताना पाहण्याची संधी मिळणार आहे.

या सामन्यातील विजयामुळे आरसीबीचे एकूण गुण १६ होतील आणि प्लेऑफमधील त्यांचे स्थान जवळजवळ निश्चित होईल. यानंतर आरसीबीला आणखी तीन सामने खेळायचे आहेत आणि त्यांचा संघ सातत्याने चांगली कामगिरी करत असल्याने, अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी त्यांना दोन संधी मिळाव्यात यासाठी ते पहिल्या दोन सामने खेळण्याचे लक्ष्य ठेवतील.

चेन्नईचा विचार केला तर, त्यांचे १० सामन्यांत फक्त चार गुण आहेत आणि ते प्लेऑफच्या शर्यतीतून आधीच बाहेर पडले आहेत. तथापि, धोनीच्या नेतृत्वाखालील संघ आरसीबीचे समीकरण बिघडवण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही. तथापि, या सामन्यात सर्वांच्या नजरा धोनी आणि कोहलीवर असतील. कोहली सध्या उत्तम फॉर्ममध्ये आहे. त्याने आतापर्यंत स्पर्धेत ४४३ धावा केल्या आहेत आणि स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजाला दिले जाणारे ऑरेंज कॅप पुन्हा मिळवण्याचा त्याचा प्रयत्न असेल. त्याला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या देवदत्त पडिकलकडून चांगली साथ मिळत आहे. देवदत्तने त्याच्या शेवटच्या दोन डावांमध्ये दोन अर्धशतके झळकावली आहेत. पण कोहलीला त्याचा सलामीचा जोडीदार फिल सॉल्टकडून अधिक योगदान हवे असेल हे निश्चितच आवडेल. आरसीबीला त्यांचा कर्णधार रजत पाटीदारकडूनही मोठ्या खेळीची अपेक्षा असेल.

चेन्नईच्या गोलंदाजांमध्ये फक्त वेगवान गोलंदाज खलील अहमद आणि फिरकी गोलंदाज नूर अहमद यांनीच आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे आणि आरसीबीचे फलंदाज याचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. पण चेन्नईच्या फलंदाजांना अशी कोणतीही विश्रांती मिळणार नाही कारण त्यांना जोश हेझलवूड, भुवनेश्वर कुमार, कृणाल पांड्या आणि सुयश शर्मा यांचा सामना करावा लागणार आहे.

चेन्नईच्या फलंदाजांनी आतापर्यंत तुकड्यांमध्ये चांगली कामगिरी केली आहे. त्याच्या संघाला आशा असेल की आयुष म्हात्रे, सॅम करन, देवाल्ड ब्रेव्हिस आणि शिवम दुबे सारखे फलंदाज चांगले योगदान देतील जेणेकरून धोनी शेवटच्या षटकांमध्ये त्याच्या परिचित आक्रमक शैलीत धावा काढू शकेल.

संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :

आरसीबी : रजत पाटीदार (कर्णधार), फिल सॉल्ट, विराट कोहली, देवदत्त पडिक्कल, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), टिम डेव्हिड, कृणाल पांड्या, रोमॅरियो शेफर्ड, भुवनेश्वर कुमार, जोश हेजलवूड, यश दयाल, सुयश शर्मा, लुंगी एनगिस्टोन, लिविंग स्टोन.

चेन्नई सुपर किंग्ज : महेंद्रसिंग धोनी, शेख रशीद, आयुष म्हात्रे, दीपक हुडा, सॅम करन, रवींद्र जडेजा, देवाल्ड ब्रेविस, शिवम दुबे, नूर अहमद, खलील अहमद, पाथिराना, आर अश्विन, कमलेश नागरकोटी, रामकृष्ण घोष, विजय शंकर, रचिन रवींद्र.

## कुळण – सावईवेरे येथील तळीच्या डिसिल्टिंग, पदपथाच्या कामाचे उद्घाटन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. २ :** वेरे – वाघुर्मे ग्रामपंचायत क्षेत्रातील कुळण – सावईवेरे येथील तळीच्या डिसिल्टिंग व पदपथाच्या कामाचे लोकार्पण नुकतेच मंत्री गोविंद गावडे यांच्या हस्ते करण्यात आले.

कुळण वाड्यावरील शिमगोत्सव मांडकडे जायची सदर वाट अत्यंत अरुंद होती.या वाटेच्या रुंदीकरणासह ती परिपक्व व्हावी अशी येथील ग्रामस्थांकडून सातत्याने मागणी केली जात होती.येथील स्थानिक पंच सदस्य बाबू गावडे यांच्या पाठपुराव्यामुळे तसेच मंत्री गोविंद गावडे यांच्या प्रयत्नाने सर्वांग सुंदर अशी वाट तयार करण्यात आली आहे. त्यामुळे कुळण वाड्यावरील ग्रामस्थांनी मंत्री गोविंद गावडे यांना दुवा दिला आहे. ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत (आर. डी ए.) सुमारे १२ लाख रुपये खर्चून सदर काम मार्गी लागले आहे.



**कुळण – सावईवेरे : तळीच्या डिसिल्टिंग व पदपथाच्या कामाचे लोकार्पण करताना मंत्री गोविंद गावडे. बाजूस श्रमेश भोसले, शोभा पेरणी, बाबू गावडे, अक्षय नाईक व इतर.**

या लोकार्पण सोहळ्यास मंत्री गोविंद गावडेसह जिल्हा पंचायत सदस्य श्रमेश भोसले, सरपंचा शोभा पेरणी, उपसरपंच बाबू गावडे, पंच अक्षय नाईक, सर्वेश नाईक, आर. डी. ए. इंजिनिअर चिन्मय तसेच बरेच ग्रामस्थ उपस्थित होते.

सर्वप्रथम मंत्री गोविंद गावडे यांच्या हस्ते फीत कापून तसेच नामफलकाचे अनावरण करून कामाचे उद्घाटन करण्यात आले.

मंत्री गोविंद गावडे म्हणाले की, प्रियोळ मतदारसंघातील प्रत्येकाच्या घरापर्यंत पक्की वाट किंवा रस्ता पोहोचावा हे माझे ध्येय आहे.त्या अनुषंगाने मी सातत्याने प्रयत्न करीत आहे. कुळण वाड्यावरील जीर्ण झालेल्या वाटेची डागडुजी करून सदर वाट रुंद करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती. बाबू गावडे व विश्वास गावडे यांच्या पाठपुराव्यामुळे तसेच ग्रामीण विकास यंत्रणेच्या सहकार्याने सदर काम मार्गी लागल्याने मला अत्यानंद होत आहे.



**पिर्ण : श्री वठारी राष्ट्रोळी ब्राह्मण पिर्ण नाईकवाडा येथील लईराईचे धोंड.**



**श्री शांतादुर्गा देवस्थान येथे रहाणारे आई लईराईचे धोंड.**

## वीज खात्यातल्या साखळी उपविभागमध्ये लाईनमन दिवस

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. २ :** साखळी नगरपालिका हॉलमध्ये वीज खात्यातल्या साखळी उपविभाग मध्ये लाईनमन दिवस साजरा करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर कार्यकारी अभियंता वल्लभ सामंत,सहाय्यक अभियंता दीपक गावस, बाळकृष्ण नाईक, कनिष्ठ अभियंता प्रितेश गावस,सुमंत कुर्टीकर, ओंकार दलाल, सागर गावडे, शौनक गावस, मुख्य कारकून सुवर्णा नाईक उपस्थित होते.

यावेळी प्रथम सर्व विज कर्मचाऱ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. नंतर केक कापून लाईनमन दिवस साजरा केला. त्यानंतर विज कर्मचाऱ्यांना सुरक्षेविषयी शपथ देण्यात आली.यावेळी बोलताना कार्यकारी अभियंता वल्लभ सामंत सर्वांनी सांगितले की, लाईनमननी आपल्या सुरक्षेची काळजी प्रथम घ्यावी व कामावर असताना व काम करताना सुरक्षेविषयी सर्व उपकरणे घालावीत. यावेळी सहाय्यक अभियंता दीपक गावस व बाळकृष्ण नाईक यांची भाषणे झाली व नंतर सर्व विज कर्मचाऱ्यांना यावेळी भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल शिरोडकर यांनी केले तरआभार प्रदर्शन कृष्ण गावस यांनी केले.




**साखळी : लाईनमन दिन कार्यक्रम प्रसंगी लाईनमन व मान्यवर.**

## हरमल येथे उद्या मोफत तपासणी, चिकित्सा शिबिर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २ :** लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटी आयोजित अखिल भारतीय आयुर्वेद संस्था, धारगळ (आयुष)तर्फे मोफत आरोग्य तपासणी व चिकित्सा शिबीर आयोजन रविवार दि. ४ रोजी सकाळी १० ते १.३० पर्यंत लोकमान्य सोसायटीत हरमल शाखेत होणार आहे.

या शिबिरात बाल चिकित्सा, मधुमेह, पोटाचे विकार, स्त्रीरोग, हृदरोग, उच्च रक्त दाब, हाडांचे व सांध्याचे विकार, सामान्य आरोग्य तपासणी, त्वचाविकार आदीबाबत मार्गदर्शन केले जाईल. आधिक माहितीसाठी ९३२२९२१५४८ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# आशिया कप २०२५ रद्द होण्याची शक्यता!

**नवी दिल्ली, दि. २ :**




सध्या भारतात आयपीएल २०२५ स्पर्धा शानदार पद्धतीने सुरू आहे. दुनियेतील स्टार खेळाडूंमुळे सजलेली ही स्पर्धा आता काही दिवसात संपेल. आयपीएल नंतर भारतीय संघ इंग्लंडचा दौरा करणार आहे. जिथे त्यांना ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. त्यानंतर आशिया कप २०२५ स्पर्धा सुरू होणार आहे. पण तत्पूर्वी या स्पर्धेवर संकटाचे सावट आले आहे. ही स्पर्धा रद्द होऊ शकते, ज्याचे मोठे कारण समोर आले आहे.

आशिया कप २०२५ स्पर्धेमध्ये भारत आणि पाकिस्तान शिवाय बाकीचे आशियाई देश सहभागी होतील. टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्ट अनुसार पहलगाम आतंकी हल्ल्यानंतर आशिया कप २०२५ रद्द होऊ शकतो. याशिवाय भारतीय संघाचा बांगलादेश दौरा सुद्धा रद्द होऊ शकतो. बांगलादेश दौऱ्यावर टी२० मालिकेशिवाय वनडे मालिका सुद्धा खेळली जाणार होती, पण आता हा सुद्धा दौरा रद्द होऊ शकतो. पहलगाम हल्ल्यानंतर बांगलादेश दौरा आणि आशिया कप २०२५ स्पर्धांवर संकटाचे सावट आहे.

पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तान विरुद्ध सक्त कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. आशिया कप २०२३ स्पर्धेचे यजमान पद पाकिस्तानच्या खांद्यावर होते, पण भारताने पाकिस्तानमध्ये जाण्यासाठी स्पष्ट नकार दिला होता.

त्यानंतर स्पर्धेचे यजमान पद पाकिस्तान आणि श्रीलंकाने सांभाळले होते. भारतीय संघाने त्यांचे सर्व सामने श्रीलंकामध्ये खेळले होते. भारत–पाकिस्तान सामना सुद्धा श्रीलंकेत झाला होता.

भारताने हा सामना त्यांच्या नावावर केला होता आणि अंतिम सामन्यात श्रीलंकेला पराभूत करून किताब त्यांच्या नावावर केला होता. याशिवाय भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये सहभाग घेऊन पाकिस्तानमध्ये खेळण्यासाठी संघ गेला नव्हता. संघाने सर्वसामने दुबईमध्ये खेळले होते. तसेच अंतिम सामना सुद्धा न्यूझीलंडला पराभूत करून जिंकला होता. भारतीय क्रिकेट संघ २००८ नंतर पाकिस्तानमध्ये गेला नाही.

# राजस्थान प्लेऑफमधून बाहेर !

▸ **मुंबई इंडियन टॉपवर**

▸ **ऑरेंज कॅपमध्ये सूर्या पहिल्या क्रमांकावर**

**जयपूर, दि. २ :**



इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल २०२५) मध्ये लीग टप्प्यातील ५० सामने पूर्ण झाले आहेत. गुरुवारी, मुंबईने सलग सहावा विजय नोंदवला. संघाने राजस्थान रॉयल्सचा १०० धावांनी पराभव केला. यासह, प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणारा आरआर दुसरा संघ बनला. दुसरीकडे, मुंबईने पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थान मिळवले आहे.

जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर हंगामातील आपला ११ वा सामना खेळणाऱ्या मुंबईने २ गडी गमावून २१७ धावा केल्या. प्रत्युत्तरात राजस्थान रॉयल्सचा संघ १६.१ षटकात ११७ धावांवर सर्वबाद झाला.

राजस्थानचा ११ सामन्यांतील हा आठवा पराभव ठरला. हा संघ फक्त ३ विजयांसह ६ गुणांसह आठव्या स्थानावर आहे आणि प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. उर्वरित तीनही सामने जिंकल्यानंतरही राजस्थानचे फक्त १२ गुण होतील, जे पात्रता फेरीसाठी पुरेसे नाहीत. या विजयासह, मुंबईने प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याचा आपला मार्ग आणखी मजबूत केला आहे. संघाने ११ सामन्यांत सातवा विजय मिळवला. संघ ४ पराभवांसह १४ गुणांसह पॉइंट टेबलमध्ये अव्वल स्थानावर पोहोचला. आता संघाला स्वतःच्या बळावर पात्र होण्यासाठी उर्वरित ३ पैकी फक्त २ सामने जिंकावे लागतील.

आज आयपीएलमध्ये जीटी एसआरएच विरुद्ध सामना खेळेल. हैदराबाद ९ सामन्यांत ३ विजय आणि ६ पराभवानंतर ६ गुणांसह ९ व्या स्थानावर आहे. आजचा सामना जिंकून, संघ प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा जिवंत ठेवेल. त्यानंतर एसआरएच ला उर्वरित ४ सामने जिंकावे लागतील आणि त्यांचा धावगती दर इतर संघांपेक्षा चांगला ठेवावा लागेल. तथापि, जर आज हैदराबाद हरले तर प्लेऑफच्या शर्यतीत त्यांना अडचणी येतील. मग उर्वरित सामने जिंकण्यासाठी संघाला इतर संघांवर अवलंबून राहावे लागेल.

गुजरात टायटन्सचे ९ सामन्यांत ६ विजय आणि ३ पराभवांसह १२ गुण आहेत. आजचा सामना जिंकून संघ १४ गुणांसह पहिल्या क्रमांकावर पोहोचू शकतो. यासाठी संघाला आपला धावगती दर मुंबईपेक्षा वर ठेवावा लागेल. जर आज जीटी हरला तर संघाला स्वतःच्या बळावर प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी उर्वरित ४ पैकी ३ सामने जिंकावे लागतील.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २४० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 240 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .